महाराष्ट्र वन विभाग

कार्यालय -०२३१/२६५३६३२.
E-mail ID -
ccftkolhapur@mahaoforest.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**

**"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३**

---

**इमेलद्वारे**

क्रमांक कक्ष-६/नोसेल/लक्ष्मी टेकडी/२२-२३/ 279
कोल्हापूर -४१६००३ दिनांक - 17 /०६/२०२२.

**प्रति,**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :** वन जमीन कोल्हापूर.
चांदोली वन्यजीव अभयारण्यातील मौ. निवळे या गावाचे कागल जि. कोल्हापूर येथे पुनर्वसन करण्यासाठी ६३.०९१ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

**संदर्भ :** १. शासन महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-१२१४/प्रक्र.१७५/फ-१०दिनांक २.०५.२०२२
२. आपलेकडील पत्र कक्ष-१७/नोडल/कोल्हापूर/आयडी-१२८८०/२८२/२०२२-२३ दिनांक ४.०५.२०२२.
३. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/२२-२३/३०१ दिनांक १८.०५.२०२२
४. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांचेकडील पत्र अ/कक्ष -५/वसं/२२-२३/३२४ दिनांक ३.०६.२०२२

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये अवर सचिव, महसूल व वन विभाग यांचेकडील दिनांक २.०५.२०२२ चे पत्रान्वये सदर प्रस्तावामध्ये १ ते २ मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. संदर्भ क्र.२ अन्वये मुद्दे निहाय अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. संदर्भ क्र.३ अन्वये उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना आवश्यक दस्तऐवजासह अहवाल सादर करणेबाबत कळविले होते.

संदर्भ क्र.४ अन्वये उपवनसंरक्षक कोल्हापूर यांनी संदर्भ क्र.१ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने आवश्यक दस्तऐवजासह अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवाल तीन प्रतीत यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांनी सादर केलेल्या अहवालास हे कार्यालय सहमत आहे. तसेच दिनांक १३.०६.२०२२ रोजी विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. मंत्री ग्रामविकास व कामगार यांचे अध्यक्षेतखाली जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटिशन क्र.११६१६/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी १६.०२.२०१६ रोजी जो निकाल दिलेला आहे त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये पुनर्विलोकन याचिका दाखल करणेबाबत अवर सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २.०६.२०२२ चे पत्रान्वये मार्गदशन मागणी केलेले आहे असे सदर बैठकीमध्ये सांगितले. (प्रत संलग्न)

त्यामुळे गलगले येथील जिल्हाधिकारी यांनी खाजगी व्यक्तींची १६ हेक्टर संपादित केलेल्या जमिनी संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मौजे निवळे या गावातील गलगले येथे विस्थापित झालेल्या लोकांनी शेतीसाठी पसंत केलेल्या मौजे लक्ष्मी टेकडी येथील ६३.०९१ हे. जमिनीचे सद्यस्थितीत निर्वणीकरण करणे आवश्यक आहे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे.

(आर.एम.रामानुजम)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

**प्रतिलिपी :** वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्र, कोल्हापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

# उपवनसंरक्षक,कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन" ताराबाई पार्क, पोस्ट ऑफिस समोर,कोल्हापूर दुरध्वनी क्र.(०२३१)२६५१९५९
फॅक्स (०२३१) २६५२८०७ ई मेल :dycfkop२००७@gmail.com


जा.क्र.अ/कक्ष-५/वनसंवर्धन/२०२२-२३/३२८ कोल्हापूर ,दिनांक :- ०३/०६/२०२२

प्रति,

मा. मुख्य वनसंरक्षक, (प्रा.)
कोल्हापूर.

**विषय**-वनजमीन-कोल्हापूर
चांदोली वन्यजीव अभयारण्यातील मौ. निवळे या गावाचे कागल, जि.कोल्हापूर येथे पुनर्वसन करण्यासाठी ६३.०९१ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

**संदर्भ** -१. शासन महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-१२१४/प्र.क्र.१७५/फ-१० दि.२.५.२०२२
२.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी) म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/कोल्हापूर/आयडी-१२८८०/२८२/२०२२-२३ दि.४.५.२०२२.
३.या कार्यालयाचे पत्र क्र.ब/पुनर्वसन/२०२२-२३ दि.२५.५.२०२२
४.उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१२ कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.भूसं-१२/आर आर /६६/२०२२ दि.१.६.२०२२.

विषयांकित प्रकरणी, चांदोली राष्ट्रीय अभयांतर्गत बाधीत झालेल्या मौ.निवळे ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर या गावाचे पुनर्वसन करणेसाठी मौ.कागल ता.कागल जि. कोल्हापूर येथील वनक्षेत्राची निवड केलेल्या वनक्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत चांदोली वन्यजीव अभयारण्यातील मौ.निवळे या गावाचे कागल, जि.कोल्हापूर येथे पुनर्वसन करण्यासाठी ६३.०९१ हे. वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावामध्ये शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भ क्र.१ अन्वये १ ते २ त्रृटी उपस्थित केलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने त्रृटी १ ची माहिती उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१२ कोल्हापूर या कार्यालयाकडे उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये मागणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१२ कोल्हापूर यांचेकडुन संदर्भ क्र.४ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्रस्तुत प्रस्तावातील त्रृटी पुर्तता अहवाल खालीलप्रमाणे आवश्यक दस्ताऐवजासह सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | त्रृटी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक तसेच उपवनसंरक्षक यांच्या स्थळ पाहणी अहवालात जिल्हाधिकाऱ्यांनी गलगले येथील खाजगी व्यक्तींची १६ हेक्टर संपादित केलेली जमीन पुनर्वसनासाठी दिली होती असे नमुद आहे. मात्र ती जमीन परत दिल्यामुळे ६३.०९१ हे. वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर क्षेत्रातील तफावतीबाबत अधिक स्पष्टता येणे आवश्यक आहे. | चांदोली अभयारण्यातील मौ.निवळे ता.शाहुवाडी येथील प्रकल्पग्रस्त यांना मौ.गलगले ता.कागल येथील गावातील संपादनपात्र खातेदारांची एकुण ४२.१८ हेक्टर आर जमिनींची भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१२ कोल्हापूर यांचे कार्यालयाकडुन भूसंपादन निवाडा एस आर/२९०/९६ दि.३०.९.२००२ अन्वये पूर्ण करणेत येवून शेतीसाठी क्षेत्र ६.२४ हेक्टर, २७ प्रकल्पग्रस्तांना व वसाहतीसाठी ६.३८ हेक्टर, ७३ प्रकल्पग्रस्तांना असे एकुण १२.६२ हेक्टर जमीन वाटप करण्यात आलेली होती व उर्वरीत २९.५६ हेक्टर जमीन फक्त भूसंपादन निवाडा जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन करण्यात आलेला आहे. ती जमीन प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेली नाही. तद्‌नंतर मौ.गलगले गावातील मुळ खातेदारांनी संपादित जमीनी संपादनातून वगळणेत यावी याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.११६१६/२०१४ आणि रिट पिटीशन क्र.११२५९/२०१४ याचिका दाखल केल्या होत्या.<br>सदर याचिकांचा निकाल दि.२२.१.२०१६ रोजी लागला |

| | | |
|---|---|---|
| | | असून त्यामध्ये संपादीत जमिनीची भूसंपादनाची कार्यवाही नविन भूसंपादन व पुनर्वसन अधिनियम २०१३ मधील कलम २४ (२) नुसार रद्द केली असल्याने उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कार्या. पुनर्वसन /उ.न्या.एस.आर /४९ /२०१७ दि.११.१.२०१८ अन्वये चांदोली प्रकल्पग्रस्त यांना वाटप करणेत आलेल्या जमीनीचे आदेश रद्द करुन मुळ खातेदार यांचे नावे ७/१२ सदरी दाखल करणेबाबत आदेश दिलेला आहे. सदर आदेशाची छायांकित प्रत या सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.<br>जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचेकडुन चांदोली प्रकल्पग्रस्त यांना शेतीसाठी २७ लाभार्थी यांना ६.२४ हेक्टर आर वाटप केलेल्या जमीनीबाबतचे आदेश रद्द केल्याने मौ. निवळे येथील २७ + उर्वरित ४६ असे एकुण ७३ बाधीत प्रकल्प ग्रस्तांकडुन संपादीत केलेले क्षेत्र ५६.५३ हे. व त्यांना देय क्षेत्र ५३.४५ हे. उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कोल्हापूर यांचेकडील संकलन पुस्तीकेवरुन घेतलेली आहे. त्यानुसार मौ. निवळे ता. शाहुवाडी येथील ७३ (गावठाण मौ. गलगले ता. कागल) प्रकल्पग्रस्तांनी शेत जमीनीसाठी जवळपास जागा नसल्याने त्यांचे पसंतीनुसार मौ.कागल ता.कागल जि. कोल्हापूर येथील जंगल गट नं. २००, २०१, २०२, २०३, २०४, २०५ & १८१ मधील क्षेत्र ६३.०९१ हे. आर वनक्षेत्राची पसंती केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर पसंत केलेल्या ६३.०९१ हे. आर (शेतीसाठी- ५३.४५ हे. व अंतर्गत रस्ते- ९.३८ हे. व पोच रस्ता - ०.२६१ हे.) क्षेत्राचा प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| २ | उपवनसंक्षक यांच्या प्रमाणपत्रात ३४७०५ वृक्षांची तोड करण्यात आली असल्याचा उल्लेख आहे. त्याबाबत अधिक स्पष्टीकरण व्हावे. | प्रस्तुत प्रस्तावात ६३.०९१ हेक्टर क्षेत्र प्रस्तावीत आहे. सदर क्षेत्रामध्ये एकुण ३४७०५ झाडे बाधित होणार आहेत. सद्यस्थितीत प्रस्तुत क्षेत्रातील झाडे तोड करण्यात आलेली नाही. सदर क्षेत्रातील झाडे तोडीचे व इतर कामे केंद्र शासनाची पुर्वमंजुरी शिवाय करण्यात येणार नाही. सोबत सुधारित प्रमाणपत्र-१९ व २० सादर केलेले आहे. |

**सोबत-वरील प्रमाणे**

(एम.एन.मोहिते)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर

# जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

(पुनर्वसन शाखा)

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर

फोन नं 0231 2658215 ई मेल dro.kolhapur@gmail.com

==========================================================

क्र.कार्या. पुनर्वसन/उ.न्या.एसआर/49/2017

दिनांक 11/01/2018

## आदेश

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल अवमान याचिका क्र. 412/2017 विरूद्ध जिल्हाधिकारी कोल्हापूर व इतर.

मौ. आलाबाद व गलगले ता. कागल हे गांव चिकोत्रा मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये येत असुन सदर दोन्ही गावातील संपादनपात्र खातेदारांच्या जमिनींची भूसंपादनाची कार्यवाही विशेष भू संपादन अधिकारी क्र. 12 यांचे कार्यालयाकडून भूसंपादन निवाडा एसआर/296/96 दिनांक 21/01/2004 (आलाबाद) व एसआर/290/96 दिनांक 30/09/2002 (गलगले) अन्वये पूर्ण करणेत आलेली आहे. त्यानुसार सदर निवाड्यातील काही खातेदारांनी संपादनाबाबतची मोबदला रक्कम स्वीकारली नाही. सदर दोन्ही गावातील खातेदारांनी संपादित जमिनी संपादनातून वगळणेत याव्यात म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. 3385/2014, 2145/2015, 3809/2015, 6146/2014 (आलाबाद) व 11616/2014, 11259/2014 (गलगले) अशा याचिका दाखल केल्या होत्या.

सदर याचिकांचा निकाल दिनांक 22/01/2016 रोजी लागला असुन मा. उच्च न्यायालयाने याचिकेमध्ये नमूद असलेल्या खातेदारांचे जमिनीपुरती संपादनाची प्रक्रिया रद्द केलेली आहे. तसेच शासनास आवश्यक असेल तर या जमिनीची नव्याने भूसंपादन प्रक्रिया राबविणेचे निर्देश दिलेले आहेत. सदरचा निर्णय शासनाच्या विरोधात गेलेने विशेष भूमी संपादन अधिकारी 12 यांचे कार्यालयातील दिनांक 14/09/2016 आणि दिनांक 08/02/2017 च्या पत्रांनी मा. सर्वोच्च न्यायालयात Special Leave Petition (SLP) दाखल करणेस परवानगी मागणी केलेली आहे. तथापी याबाबत अद्यापपर्यंत परवानगी प्राप्त झालेली नाही.

उपरोक्त याचिकांमधील याचिकाकर्ता यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये वरिल रिट पिटीशन मध्ये अवमान याचिका क्र. 412/2017 दाखल केलेली आहे. तरी दिनांक 22/01/2016 रोजीचे रिट पिटीशन क्र. 3385/2014, 2145/2015, 3809/2015, 6146/2014 मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार व दिनांक 16/02/2016 रोजीचे रिट पिटीशन 11616/2014, 11259/2014 मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार भूसंपादन प्रक्रिया रद्द केली आहे. त्यामधील खातेदार व शेतजमिन यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

# मौ. अलाबाद ता. कागल

| अ.क्र. | रिट पिटीशन क्र. | याचिकाकर्तांचे नाव | दि. 21/04/2004 चे संपादन निवाडे प्रमाणे गट नं व क्षेत्र | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | गट नं | क्षेत्र | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 3385/14 | श्री. अशोक बंडू खाडेकर<br>श्री. बाजीराव बंडू खांडेकर | 95<br>84 | 1 हे 56.80 आर<br>0 हे 49 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूर्न यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. अब्दूल मुनाफ दादा देसाई म.वा. अफसर पाशा देसाई | 213 | 0 हे 40 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूर्नव यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. भिकाजी रामा कांबळे सं.कु. आप्पाण्णा नायकु माळी, | 190 | 0 हे 52 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूर्नव यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. भिकाजी रामा कांबळे | 391 | 0 हे 59 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पून यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. दादू कोंडीबा खांडेकर म.वा. रामचंद्र दादा चौगूले | 1 | 1 हे 21 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्रीम. हौसाबाई विष्णू बारवेकर | 87 | 0 हे 40 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. नायकु आप्पा कामते म.वा. उमाजी नायकु कामते | 108 | 0 हे 37 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. गुंडू अर्जूना कामते म.वा. नाना गुंडू कामते | 9 | 0 हे 36 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. तुकाराम संताराम चौगुले म.वा. संजय तुकाराम चौगुले<br>श्री. वसंत संतराम चौगुले म.वा सुभाष वसंत चौगुले<br>श्री. ज्ञानदेव संतराम चौगुले म.वा विनायक ज्ञानदेव चौगुले<br>श्री. आण्णासो संतराम चौगुले म.वा. प्रकाश आणासो चौगुले | 80 | 0 हे 80 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. महादेव गुंडू खराडे | 128 | 1 हे 02 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| 2 | 6146/14 | श्री. अब्दुलमजीद हायाचांद मनोळी, | 292 | 0 हे 37 आर | एकूण 1 हे 11 आर संपादन पैकी 0 हे 84 आर वाटप शिल्लक 0 हे 27 आर मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचाकल प्रकल्प पुनर्वसन (जमिन) कोल्हापूर यांचे नावे शिल्लक |
| | | श्री. बाबासो हयाचांद मनोळी, | 292 | 0 हे 37 आर | |
| | | श्री. नजीरअहमद हयाचांद मनोळी | 292 | 0 हे 37 आर | |
| 3 | 2145/15 | श्री. हरि काळू बरकाळे म.वा. मारूती हरी बरकाळे म.वा. बाळासो उर्फ बाळकृष्ण मारूती बरकाळे (सं.कु.) | 127<br>125 | 0 हे 31 आर<br>0 हे 20 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | श्री. हरि काळू बरकाळे म.वा. श्रीपती हरी बरकाळे म.वा. शिवाजी श्रीपती बरकाळे व संभाजी श्रीपती बरकाळे (सं.कु) | 127 | 0 हे 28 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. हरि काळू बरकाळे म.वा. दत्तू हरी बरकाळे म.वा. मधुकर दत्तू बरकाळे (सं.कु.) | 127 | 0 हे 29 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | | श्री. धोंडीराम रामचंद्र सरवडे | 125 | 0 हे 20 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| 4 | 3809/15 | श्री. महमदपाशा अब्दूल्ला देसाई व इतर | 137<br>165<br>174<br>221/अ<br>303 | 7 हे 53 आर<br>1 हे 22 आर<br>2 हे 44 आर<br>6 हे 55 आर<br>2 हे 70 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्वसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |
| | 11259/14 | श्री. आप्पासो चिंतामण उत्तूरे म.वा. अशोक आप्पासो उत्तूरे व ईतर 4 | 145 | 1 हे 81 आर | मा.जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पूनर्रवसन यांचे नावे 7/12 -वाटप झाले नाही. |

एकूण 32 हे 36 आर

**मौ. गलगले ता.कागल**

| अ. क्र. | रिट पिटीशन क्र. | याचिकाकर्ताचे नाव | दि. 30/09/2002 चे संपादन निवाडे प्रमाणे गट नं व क्षेत्र | | शेरा (संपादित शेत जमिन खालील प्रकल्पग्रस्तांना वाटप करणेत आलेली आहे.) |
|---|---|---|---|---|---|
| | | | गट नं | क्षेत्र | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 11616 | श्री. बापूसो नारायण कुलकर्णी व इतर | 536 | 1 हे 42 आर | 1) सखुबाई ज्ञानू पाटील 0.20 आर<br>2) शिवा केदारी चौगुले 0.20 आर |
| | | श्री. व्यकटेश देव वहिवाटदार | | | |
| | | श्री. बापूसो नारायण कुलकर्णी | 182 | 0 हे 40 आर | विठ्ठल बंडू बडदे 0.20 आर |
| | | श्री. जोती धोंडी चव्हाण | 438 | 0 हे 33 आर | |
| | | श्री. आप्पय्या इराप्पा जंगम ए.पु. | 155 | 1 हे 30 आर | |
| | | श्री. पांडूरंग दादू डावरे | 459 | 1 हे 21 आर | |
| | | श्री. आनंत परशराम डावरे म.वा. शिवाजी आनंत डावरे | 572 | 1 हे 38 आर | गट नं 496 पै 0.40 आर स्वेच्छा ताबा<br>1) शामराव बंडू पाटील 0.20 आर<br>2) गणू बापू पाटील 0.20 आर |
| | | श्री. राजाराम शंकर डावरे<br>श्री. कृष्णात शंकर डावरे | 532 | 1 हे 18 आर | |
| | | श्रीम. रखमाबाई श्रीपती डावरे<br>श्रीमती. वत्सला राजाराम नाईक | 542 | 0 हे 30 आर | |
| | | श्री. विरूपाक्ष बसाप्पा तारळे म.वा. शिवलींग व ईश्वरा विरूपाक्ष तारळे, नागाप्पा व निंगाप्पा बसाप्पा तारळे | 179<br>71 | 0 हे 53 आर<br>0 हे 93 आर | |
| | | श्री. पांडूरंग कृष्णा पाटील | 467 | 0 हे 80 आर | |
| | | श्री. गुंडू हरि पाटील म.वा. पांडूरंग गुंडू पाटील | 424 | 0 हे 22 आर | |
| | | श्री. केरबा बापू पाटील म.वा | 133 | 0 हे 36 आर | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | संदिप केरबा पाटील | | | |
| | | श्री. मारूती दौलू पाटील | 465 | 1 हे 21 आर | 1) ज्ञानू साबळा पाटील 0.20 आ<br>2 मुक्ताबाई मारूती मुळीक 0.20 |
| | | श्री. दत्तू धोंडी पाटील म.वा दगडू, आण्णाप्पा, तुकाराम, बाळकृष्ण दत्तू पाटील | 555 | 0 हे 40 आर | |
| | | श्री. गोपाळ गणू पाटील म.वा. उत्तम गोपाळ पाटील | 482 | 0 हे 80 आर | |
| | | श्री. शशिकांत मारूती पडळकर ए.पु. | 417 | 1 हे 09 आर | |
| | | श्री. पुंडलीक म्हातू बांबरे | 445 | 0 हे 81 आर | |
| | | श्री. दामू रामू बांबरे | 444/अ | 0 हे 40 आर | |
| | | श्री. सदाशिव नारायण कुलकर्णी<br>म.वा. अभय सदाशिव कुलकर्णी | 436<br>181 | 6 हे 38 आर<br>1 हे 27 आर | *गट नं 436 मध्ये चांदोली अभयारण्यग्रस्त नि वसाहत वसली आहे.* |
| | | श्री. अतुल सदाशिव कुलकर्णी | 546<br>439/अ | 1 हे 30 आर<br>0 हे 31 आर | *439/अ पै 0.31 आर*<br>*1) विष्णू विठू पवार 0.11 आर*<br>*2) शामराव रामू मुळक 0.20 आर* |
| | | श्री. अभय सदाशिव कुलकर्णी | 546<br>439/अ | 1 हे 30 आर<br>0 हे 31 आर | *439/अ पै 0.31 आर*<br>1) विष्णू विठू पवार 0.11 आर<br>2) ज्ञानू बंडू बडदे 0.20 आर |
| | | श्री.प्रकाश विठ्ठल कुलकर्णी | 439/अ<br>439/ब<br>189<br>186<br>592 | 1 हे 00 आर<br>0 हे 84 आर<br>0 हे 40 आर<br>1 हे 30 आर<br>2 हे 52 आर | 439/अ पै 1 हे 00 आर<br>1) हौसाबाई रामचंद्र पाटील 0.20 आर<br>2) तुकाराम बंडू बडदे 0.20 आर<br>3) आण्णासो पांडूरंग पाटील 0.20 आर<br>4) आकाबाई कोंडीबा चौगुले 0.20 आर<br>5) मारूती कोंडीबा चौगुले 0.20 आर<br>439/ब पै 0 हे 84 आर<br>1) रामु लखु पाटील 0.20 आर<br>2) गिताबाई हणमंत मुळीक 0.20 आर<br>3) बंडू पांडूरंग मुळीक 0.20 आर<br>191 पै 0.20 आर<br>1) पांडूरंग धोंडीबा बडदे 0.20 आर<br>188 पै 1 हे 04 आर<br>1) प्रकाश विठ्ठल पाटील 0.20 आर<br>2) पांडूरंग सयाजी पाटील 0.44 आर<br>3) किसाबाई धोंडीबा पाटील 0.40 आर |
| | | श्री. व्यंकटेश बापूसो कुलकर्णी | 592<br>439/अ | 1 हे 42 आर<br>1 हे 00 आर | 439/अ पै 1 हे 00 आर<br>1) रामचंद्र ज्ञानू राणे 0.20 आर<br>2) विठ्ठल पांडूरंग पाटील 0.20 आर<br>3) आनंदा धोंडीराम बडदे 0.20 आर<br>4) विठ्ठल ज्ञानू पाटील 0.20 आर<br>5) नामदेव रामू मुळीक 0.20 आर |
| | | श्री. विठ्ठल नारायण कुलकर्णी | 161/अ<br>161/ब | 1 हे 69 आर<br>0 हे 38 आर | 161/ ब पै 0 हे 38 आर<br>1) विष्णू रामु मुळीक 0.38 आर |
| | | श्री. आण्णाप्पा तुकाराम डावरे | 455 | 0 हे 80 आर | |
| | | श्री. शामराव रामू बांबरे | 188 | 0 हे 40 आर | |

1) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याचिकाकर्ताच्या उपरोक्त नमुद जमिनींच्या 7/12 पत्राकातील भोगवटादार सदरी मा. जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पुनर्वसन (जमिन) कोल्हापूर यांचे नाव कमी करून मुळ खातेदार यांची नावे भोगवटादार सदरी दाखल करणेत यावीत.

2) मौ. आलाबाद व मौ. गलगले ता. कागल येथिल याचिकाकर्त्याच्या संपादित जमीनी नागनवाडी प्रकल्पग्रस्त व चांदोली प्रकल्पग्रस्त यांना वाटप करणेत आले असलेचे दिसुन येते. तरी सदरचे जमीन वाटप आदेश रद्द करण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून करणेत येत आहे. जमिनीच्या 7/12 पत्रकात प्रकल्पग्रस्तांची नावे दाखल असल्यास ती नावे कमी करून संबधित याचिकाकर्ते/मुळ खातेदार यांची नावे दाखल करणेत यावीत.

3) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या जमिनी संपादित करणे आवश्यक असलेस संपादनाची प्रक्रिया राबविणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच उपरोक्त नमुद याचिकाकर्ते/खातेदार हे चिकोत्रा प्रकल्पाच्या नियत दिनांकरोजीच्या अ पत्रकानुसार संपादनपात्र होत असलेने 7/12 पत्रकाच्या इतर हक्कात " **प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादनपात्र सबब हस्तांतरणास व विभाजनास बंदी** " असा शेरा ठेवणेत यावा.

4) सदरची कार्यवाही मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उपरोक्त नमुद याचिकाकर्ते/खातेदार यांचे संपादन केलेल्या जमिनीस लागू आहे.

**उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)**
**कोल्हापूर**

प्रत :- 1) उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. 12 कोल्हापूर

2) उपविभागीय अधिकारी राधानगरी-कागल उपविभाग, कोल्हापूर

3) तहसिलदार कागल ता. कागल

2/- सदर आदेशाच्या अंमल तात्काळ घेवून त्याबाबतचा फेरफार व 7/12 उतारा उलटटपाली सादर करावा.

**उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)**
**कोल्हापूर**

# CERTIFICATE NO.19

**Cost of felling of tree certificate (Project Authority)**

This is certified that This proposal is Disforest Forest area for Rehabilitation in Village –Kagal Forest Gat 200,201,202,203,204,205 Required area 62.83 ha. and Forest Gat No 181 area in 0.261 ha.for Road, Total Disforest Area 63.091 ha. This Proposal for Rehabilitated of Village- Nivale project affected persons/ khatedar Tal – Shahuwadi Dist- Kolhapur of (Chandoli WildLife Sanctuary) Sahyadri Tiger Reserve and 34705 trees to be felled under the project and project authority agrees to defray the cost of felling the trees.

**Place : Kolhapur**

**Dated :** 3 /६/**2022**

(M. N. Mohite)
Deputy Conservator of Forest
Kolhapur Forest Division, Kolhapur

# CERTIFICATE NO. 20

## Number of cutting and felling of trees Certificate of Dy.C.F.

This is certified that This proposal is Disforest Forest area for Rehabilitation in Village –Kagal Forest Gat 200,201,202,203,204,205 Required area 62.83 ha. and Forest Gat No 181 area in 0.261ha.for Road, Total Disforest Area 63.091 ha. for the Rehabilitated of Village- Nivale project affected persons/ khatedar Tal –Shahuwadi Dist- Kolhapur of (Chandoli Wildlife Sanctuary) Sahyadri Tiger Reserve and 34705 trees to be felled under the project and project authority agrees to defray the cost of felling the trees.

**Place : Kolhapur**

**Dated : 3 /6 /2022**

(M. N. Mohite)
Deputy Conservator of Forest
Kolhapur Forest Division, Kolhapur

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा) कोल्हापूर
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड,कोल्हापूर-४१६ ००३.
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव फोननं.:-०२३१/२६५८२१५ ई-मेल:-dro.kolhapur@gmail.com

पत्र

क्र.कार्यासन-१५(२)/पुनर्वसन/आरआर/646 /२०२२
दिनांक :- 02 / 08/ २०२२

प्रति,

मा. अवर सचिव,
मदत व पुनर्वसन विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२.

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र.. ११६१६/२०१४ श्री. बापुसो नारायण कुलकर्णी व इतर // विरुध्द / महाराष्ट्र शासन व इतर

महोदय,

मौजे गलगले ता. कागल जि. कोल्हापूर येथील खातेदार श्री. बापुसो नारायण कुलकर्णी व इतर यांच्या मौजे गलगले ता. कागल येथील जमिनी विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १२ कोल्हापूर यांचेकडील अंतिम निवाडा क्र.भूसंपादन/एसआर/२९०/९६ दिनांक ३०/०९/२००२ अन्वये चिकोत्रा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादन करणेत आलेल्या आहेत. सदर निवाड्यातील खातेदारांना विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १२ कोल्हापूर यांचेकडून भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम १२(२) नुसार नोटीस दिनांक ११/०८/२००३ रोजी बजावली होती. परंतू सदर याचिकेतील खातेदार यांनी त्यांच्या संपादीत जमिनीची नुकसान भरपाई रक्कम स्विकारली नाही. परंतू सदर जमिनीचा ताबा दिनांक २४/११/२००४ रोजी रितसर कब्जेपट्टी पंचनामेसह घेणेत आला.

२. त्यानुसार मौजे गलगले ता. कागल येथील उपरोक्त संपादीत जमिनीमध्ये चांदोली अभयारण्य प्रकल्पातील वसाहत वसविण्यात आली आहे. तथापि गलगले येथील उपरोक्त याचिकेमधील खातेदारांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ११६१६/२०१४ ही याचिका दाखल केली होती. सदर याचिकेचा निकाल दिनांक १६/०२/२०१६ रोजी लागला असून मा. न्यायालयाने याचिकाकर्ता यांनी सदर संपादीत जमिनींची नुकसान भरपाई रक्कम उचल केली नसल्याने ती भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ३१(२) नुसार जिल्हा न्यायालयात जमा केली नसलेने सदर जमिनींची भूसंपादन कार्यवाही व्यपगत ठरविली आहे. तसेच मा. न्यायालयाने सदर याचिकेतील याचिकाकर्ता यांच्या जमिनींची नव्याने भूसंपादन कायद्यातील तदतुदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस राज्य सरकारला मुभा असेल, असा निर्णय मा. न्यायालयाने पारीत केला आहे.

३. तदनंतर मा. उच्च न्यायालयाच्या सदर रिट पिटीशनमधील दिनांक १६/०२/२०१६ रोजीचे निकालानुसार कोणतीच कार्यवाही झाली नाही म्हणून मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र ४१२/२०१७ दाखल केली होती. सदर अवमान याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे दि. १६/०२/२०१६ रोजीचे निकालानुसार इकडील क्र.कार्यासन/पुनर्वसन/उ.न्या./एसआर/४९/२०१७ दिनांक ११/०१/२०१८ चे आदेशाने याचिकेतील याचिकाकर्ते यांचे जमिनींवर असलेले प्रकल्पग्रस्तांची नावे कमी करुन मूळ मालक यांची नावे दाखल करणेबाबत आदेश पारीत केला. सदर आदेशानुसार संबंधीत जमिनींचे ७/१२ चे कब्जेदार सदरी असलेले प्रकल्पग्रस्तांची नावे कमी



2021.09.12 11:36

करुन मूळ मालक यांची नावे दाखल ७/१२ चे इतर हक्कात "प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादनपात्र सबब हस्तांतरणास व विभाजनास बंदी" असा शेरा ठेवणेत आला.

४. तदनंतर मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथ दाखल विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. ९०३६-९०३८/२०१६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६, मार्च २०२० रोजी निकाल पारीत केला आहे. सदर निकालामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रातील परिच्छेद क्र. ३६२ व ३६२ मध्ये नमूद केलेनुसार पुणे महानगरपालिका व श्री बालाजीनगर असोसिएशनच्या प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या आधारे बहुसंचख्य भूसंपादन प्रकरणात संपादन प्रक्रिया व्यपगत केली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६ मार्च २०२० रोजीचा न्यायनिर्णय विचारात घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपीठाने कलम २४ च्या आधारे ज्या बहुसंख्य भूसंपादन प्रकरणात प्रक्रिया व्यपगत केलेली आहे. त्या सर्व प्रकरणांचे पुनरावलोकन करण्यास्तव मा. उच्च न्यायालयात पुर्नविलोकन याचिका (Review Petition) दाखल करण्यात याव्यात. असे शासनाचे महसूल व वन विभागाने क्र.न्यासप्र-२०२०/प्र.क्र.२९/अ-२, दिनांक २३ जून २०२० चे परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत.

५. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सिव्हील अपिल नं. १९०/२०२२ मध्ये दिनांक ०६ जानेवारी २०२२ रोजी निकाल दिला असून सदर निकालापत्रातील पान क्र. २ वरील मुद्दा क्र. ३६६.३ मध्ये मा. न्यायालयाने ज्या प्रकरणात संपादीत जमिनींचा ताबा घेतला आहे, परंतू जमिनीचा मोबदला स्विकारला नाही, तर असे प्रकरण व्यपगत होत नाही, असे स्पष्ट केले आहे.

६. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १२ कोल्हापूर यांनी त्यांचेकडील दिनांक ०८/०७/२०२०, दि. २६/०३/२०२१, दि. १०/०१/२०२२ व दि. २५/०१/२०२२ चे पत्रान्वये रिट पिटीशन क्र. ११६१६/२०१४ मध्ये पुर्नविलोकन याचिका (Review Petition) दाखल करणेकामी पुढील कार्यवाही करणेबाबत मा. मुख्य सरकारी वकील, उच्च न्यायालय, रिट सेल, मुंबई यांना कळविले आहे. त्यानुसार त्यांचेकडून सदर याचिकेमध्ये पुर्नविलोकन याचिकेचा मसुदा तयार करुन उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १२ कोल्हापूर यांचे कार्यालयास पाठविला आहे. त्यानुसार सदर पुर्नविलोकन याचिकेमध्ये कार्यालयीन कागदपत्रांची पडताळणी करुन मान्यतेसाठी सरकारी वकील यांचेकडे पाठविणेत आलेला आहे. परंतू अद्याप त्यास मान्यता मिळालेली नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १६/०२/२०१६ रोजी निकालामध्ये मा. न्यायालयाने याचिकेमधील जमिनींची नव्याने भूसंपादनाची कार्यवाही करणेस मुभा दिलेली आहे.

७. सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६ मार्च, २०२० रोजीच्या निर्णयानुसार रिट पिटीशन क्र. ११६१६/२०१४ या याचिकेतील जमिनींची भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत होत नाही, अशी इकडील धारणा आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयामध्ये सदरची बाब पुर्नविलोकन याचिकेच्या माध्यमातून मा. न्यायालयाचे निदर्शणास आणून द्यावी अगर याचिकेमधील मौजे आलाबाद ता. कागल येथील जमिनींची नव्याने भूसंपादनाची कार्यवाही करावी, याबाबत मार्गदर्शन मिळणेस विनंती आहे.

आपला विश्वासू,

(किशोर पवार)
अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर

प्रत :-

१) मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १२ कोल्हापूर यांना माहिती व पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी

2021.09.12 11